म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय ९१.०१
ग्रा. क्र. ७३६
IRBK-0137635
IRBK-0107635




म. ग्रं. सं. ठाणे
विषय
क्र. नं. ८९४

# अनुक्रम


१. पैगंबर महंमदाचें चातुर्य ३
२. नवे पाहुणे ५
३. आजीबाई ७
४. मूर्तीत देव आहे का ? ९
५. तीन प्रश्न ११
६. बोलकी गुहा १३
७. गरीब म्हातारीचें स्मारक १५
८. शहाणा उमेदवार १८
९. भगवान् बुद्धाचा शांतपणा २०
१०. चोरी पकडणारा बैल २२
११. शहाणा वझीर २५
१२. जादूगार २७
१३. पानपट्टीवाला दरबारी झाला २९
१४. राजा भोज निरुत्तर झाला ३२
१५. सडेतोड उत्तर ३४
१६. दोन खलाशी ३६
१७. आंबे काय म्हणाले ? ३९
१८. बदललेली पृथ्वी ४१
१९. मरणाला फसविलें ! ४३
२०. प्रसंगावधान ४५
२१. गाढवाचे भाईबंद ४७
२२. ह्याला म्हणतात चातुर्य ४९
२३. सोन्याची किल्ली ५१
२४. महत्त्वाच्या गोष्टी ५३
२५. कसें बोलावें ? ५५


© केशव भिकाजी ढवळे


पहिली आवृत्ति : १९५९

मुद्रक : बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २
प्रकाशक : बा. ग. ढवळे, केशव भिकाजी ढवळे, चिराबाजार, मुंबई २

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
वा. क्र. ७६३५ नों दि
वि. ...

# शहाणपण

# पंचविशी

लेखक
गजानन महादेव वैद्य, एम्. ए.

IRBK-0107635

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

किंमत बहात्तर नये पैसे

# ओळख

ज्ञान आणि मनोरंजन ह्यांसाठीं गोष्टींचा उपयोग करण्याची शिक्षणपद्धति ह्या देशांत फार जुन्या काळापासून चालू आहे. हितोपदेश व पंचतंत्र हे ग्रंथ ह्या गोष्टीची साक्ष देत आहेत. इसापनें आपलें नांव कशावर अजरामर केलें ? ह्या पुस्तकाची रचनाही तशीच आहे.


बुद्धिसामर्थ्य ही देवानें दिलेली देणगी आहे. संपत्तीपेक्षांही ती बहुमोल आहे. तिच्या जोरावर आपलें जीवन कसें यशस्वी करितां येतें हें ह्या छोट्या गोष्टी तुम्हांला सांगतील. आपल्या बुद्धिवैभवाचा कसा उपयोग करावा आणि रोजच्या जीवनांत आपण कसें विजयी व्हावें हें ह्या गोष्टी सांगतील आणि तेंही हसवीत सांगतील. बुद्धिचातुर्याची ज्योत वाचकांच्या मनांत सदैव तेवत राहो आणि त्यांचें आयुष्य यशरूपी प्रकाशानें उजळण्यास त्यांस मदत करो एवढीच लेखकाची इच्छा.

बुद्धिसामर्थ्याला देश, काल, जाति, वगैरे बंधनें नाहींत हा मुद्दाही ह्या गोष्टी हळूच सांगतील. जुन्या सोन्याला उजाळा देऊन हा नवा दागिना बनविला आहे. हा वाचकांना आवडो आणि त्यांना आनंद देवो.

ग. म. वैद्य

मकरसंक्रांति, १८८०

२४७३५
१५-३-५८



# १. पैगंबर महंमदाचें चातुर्य

महंमद पैगंबर ह्यांच्या लहानपणची गोष्ट. लहानपणापासून त्यांची बुद्धिमत्ता आणि चातुर्य हीं लोकांच्या नजरेस येत होतीं आणि त्यामुळें लोकांवर त्यांचें वजनही पडत असे. हा मुलगा पुष्कळांना हवासा वाटे, कारण त्याचें बोलणें-चालणें नम्रपणाचें आणि करणें तर शहाणपणाचेंच असे.

त्या वेळीं अरब लोक मूर्तिपूजा करीत, दगड-वृक्ष ह्यांनाही देव मानीत. मक्केंतील मशिदींत अद्यापही पवित्र मानला जाणारा काबा दगड त्या वेळींही पवित्र मानीत. देवळाच्या भिंती वगैरे पडत होत्या त्यांची डागडुजी करण्याचें काम चालू होतें. ह्या पवित्र काबा दगडावर कांहीं घाण पडूं नये म्हणून तो ठेविला होता तेथून दुसरीकडे ठेवावयास पाहिजे होता. मक्केंतील लोक त्या वेळीं आपसांत भांडत असत आणि अल्पस्वल्प कारणानें मारामाऱ्या पण होत असत. हा पवित्र दगड कोणीं उचलून ठेवावा ह्याविषयीं वाद सुरू झाला. गांवांत चार पक्ष होते आणि प्रत्येकजण आपल्या पक्षालाच हा दगड उचलण्याचा मान मिळावा असें म्हणत होता. जो दगड उचलण्याची पाळी आली त्या वेळीं चारी पक्षांचे लोक तेथें जमा झाले आणि आपापला हक्क त्यांनीं जोरदार शब्दांत लोकांपुढें मांडला.


चारी पक्षांचें म्हणणें ऐकूनही हें काम कोणीं करावें हें ठरेना. प्रकरण हातघाईवर येणार असा रंग दिसूं लागला. प्रत्येक पक्षाचे लोक त्या ठिकाणीं जरूर पडली तर लढाई देण्याच्याच तयारीनें आलेले दिसले. एका पक्षाचे लोक पुढें होतांच इतर पक्षांच्या लोकांनीं मारामारीची तयारी केली हें पाहून एक वृद्ध अरब त्यांना म्हणाला, "तो पाहा महंमद येत आहे. त्यालाच आपण आपला निवाडा करावयास सांगूं. तो सांगेल तें सर्वांनीं ऐकायचं." सर्व पक्षांना हें म्हणणें मान्य झालें.

ह्या वेळीं छोटा महंमद देवळांत आला. तो पुढें येतांच सर्व पक्षांनीं आपापली बाजू पुढें मांडून आपला हक्क काबा उचलण्याचा आहे असें महंमदाला सांगितलें. तो म्हणाला, "एवढंच ना! हा तर हक्क सर्वांचाच आहे." असें म्हणून अंगावरील चादर त्यानें जमिनीवर पसरून म्हटलें,



"ह्या चादरीवर काबा ठेवूं. आतां चारी पक्षांच्या लोकांनीं ह्या चादरीचं एक एक टोंक धरावं म्हणजे सर्वांनाच हा मान मिळेल आणि तो उचलून नेणं सर्वांनाच सोपं होईल." महंमदाचें सांगणें सर्वांना पटलें. त्यांनीं चादरीचे कोपरे धरून काबा उचलला व तें भांडणही मिटलें.

# २. नवे पाहुणे




महंमद पैगंबराच्या इस्लाम धर्माचा प्रसार खूप जोरानें चालू होता. त्या वेळीं इराणांत झोरोस्टरनें स्थापन केलेला धर्म चालत होता. त्या देशांत अरबांनीं इस्लामी धर्माचा प्रसार सुरू केला. त्या वेळीं कित्येक इराणी-पारशी-लोक आपला देश सोडून निघाले. ते इराणांतून एका गलबतांत बसून हिंदुस्थानच्या पश्चिमेकडील दीव बंदरांत दाखल झाले. दीव बंदरांत उतरल्यानंतर आस्ते आस्ते ते संजाण बंदरीं गेले.

ते लोक परदेशाचे असल्यानें ह्या देशांत राहाण्याची त्यांना परवानगी पाहिजे होती. ती राजानें द्यावयास पाहिजे नाहींतर त्यांना ह्या देशांत राहातां आलें नसतें. संजाण बंदरीं पोचल्यावर ह्या लोकांनीं आपल्यांतील कांहीं लोकांना आपले प्रतिनिधि निवडिलें आणि त्यांना संजाण येथील राण्याकडे पाठविले. राण्याची त्यांनीं भेट घेतली व "ह्या ठिकाणीं आम्हांला राहावयास परवानगी द्या. हिंदुस्थान हा सर्व धर्मांना सहानुभूतीनें वागविणारा देश आहे." असें म्हटलें.


राणा ह्यावर कांहीं बोलला नाहीं. त्यानें कांठोकांठ भरलेले दुधाचे ताले त्या प्रतिनिधींपुढें केले आणि म्हटलें, "ह्या पेल्यांत जसं कांठोकांट

दूध भरलं आहे, तशीच ह्या संजाण बंदरांत लोकवस्ती आहे. मग तुम्ही कसे राहाणार ? " थोडा वेळ विचार करून त्या पुढाऱ्यांनीं साखर आणविली व थोडथोडी साखर त्या पेल्यांत घातली. साखर आंत घालतांना दुधाचा एक थेंबही सांडणार नाहीं अशी त्यांनीं काळजी घेतली होती.



असें करून त्यांनीं आपला आशय राजाला कळविला. त्यांचा आशय हाच कीं ह्या दुधांत साखर पडून तें गोड मात्र झालें पण दुधाचा एक बिंदूही सांडला नाहीं, त्याप्रमाणें आम्ही ह्या राज्यांत राहूं. लोकांचें कल्याणच करूं. आमच्यामुळें कोणालाही बाहेर जावें लागणार नाहीं.

हा त्यांचा आशय जाणून आणि त्यांचें चातुर्य पाहून राणा खूष झाला. त्यानें त्यांना आपल्या राज्यांत राहूं दिलें. अशा रीतीनें आपल्या बुद्धिचातुर्यानें त्यांनीं हिंदुस्थानांत राहाण्याची परवानगी मिळविली. हिंदुस्थान हाच आपला मायदेश आहे असें मानून पारशी लोक आज ह्या देशांत राहात आहेत आणि त्यांनीं अनेक प्रकारें आपल्या देशाच्या प्रगतीच्या कामीं मदत केली आहे.



## २. आजीबाई


रामभाऊ आणि त्यांचे बंधु हे तरुण होते. त्यांच्या बायकाही अर्थात तरुणच होत्या. घरांत सर्वच मोठीं माणसें वयानें तरुण, फार तर प्रौढ होतीं. त्यांचे आचारविचार जमत आणि तीं मोठ्या आनंदानें कालक्रमणा करीत. त्यांच्या घरांत त्यांची आजी ही एकच काय तें वृद्ध माणूस होतें. त्या तरुण मंडळीला पुष्कळदा म्हातारीची कटकट वाटे आणि समारंभांत व प्रवासांत तर ते तिला अडगळच समजत. तरीपण ते सर्व आजीबाईला मान देत आणि शक्य तितकें तिच्या सुखसोयींकडे पण पाहात.

रामभाऊंच्या एका मुलीचें लग्न ठरलें. लग्न वराच्या गांवीं व्हावयाचें होतें. रामभाऊंच्या घरचीं सर्वच माणसें लग्नाच्या वऱ्हाडांत निघणार होतीं. शिवाय त्यांचें मित्रमंडळ आणि नातेवाईकही होते. वृद्ध आजीला न्यावें कीं नाहीं ह्याबद्दल कडाक्याचा वाद झाला. अर्थातच तो त्यांच्या नकळतच झाला. त्यांचें सोवळेंओवळें, म्हातारपण, वगैरे कारणांनीं त्यांना त्रास न देणें हें बरें असें तरुण स्त्रियांचें मत पडलें. इतक्यांत एक शेजारी गृहस्थ मसलतींत होते ते म्हणाले, “म्हातारीला अवश्य न्या. तुमच्या घरचं हें मंगलकार्य आजींच्या आयुष्यांतलं शेवटचंच ठरण्याचा बराच संभव

आहे. त्यांना इथें एकट्याच कां ठेवतां? मंगलकार्यांत नववधूवरांना त्यांचा आशीर्वाद अवश्य पाहिजे. शिवाय हीं म्हातारीं माणसं मोठीं युक्तिबाज असतात, त्यांचा अनुभवही फार मोठा असतो."


शेजाऱ्यांच्या मताला मान देऊन आजीबाईंनाही नेण्याचें ठरलें. यथाकालीं वऱ्हाड निघालें आणि वराच्या गांवीं पोंचलें. ठरल्या वेळीं आणि ठरल्या ठिकाणीं विवाहसमारंभ सुरू झाला. लग्न लागलें आणि दुसऱ्या दिवशीं भोजनसमारंभ वधूच्या गृहीं करण्याचें ठरलें. सर्व तयारी झाली. ठरल्या वेळीं पानें मांडलीं पण वराकडील लोकांचा पत्ता नाहीं. चौकशी करितां कळलें कीं जांवईबुवा रुसले आहेत तेव्हां त्यांची समजूत काढणें जरूर आहे.

रामभाऊंच्या तर्फे त्यांचे बंधु व्याह्यांकडे गेले. जांवयांचें म्हणणें—मागणें काय आहे अशी त्यांनीं पृच्छा केली. जांवई म्हणाले, "आमच्या दारची विहीर तुपानें भरून द्या कीं उठतोंच जेवणाला!" हें ऐकून वधूपक्षाकडील लोकांचें धाबें दणाणलें! आतां एवढें तूप कोठून आणावें व काय करावें हेंच कोणाला कळेना! शेवटीं रामभाऊ आजीकडे गेले व सर्व



हकीगत सांगून म्हणाले, "आजी, ह्या संकटांतून कसं पार पडायचं?" आजी हसत म्हणाली, "अरे! ह्यांत कसलं मोठं संकट! व्याह्यांना कळवा, तूप तयार आहे. विहिरींतून पाणी काढून पुसून कोरडी करून द्या!" आतां रामभाऊंना उमजलें! हा निरोप जातांच व्याही पण समजले आणि जांवयाचा रुसवा जाऊन ते भोजनास हजर झाले.

## ४. मूर्तींत देव आहे का?



आजकाल मूर्तींकडे पाहाण्याची दृष्टि बदलली आहे. मूर्तिपूजा पुष्कळांना मान्यही नाहीं. पण मूर्तिपूजा करणारे ती कां करितात हें समजून घेतलें तर त्यांतही पुष्कळ अर्थ आहे, असें सहज दिसून येईल.

स्वामी विवेकानंद हे एका श्रीमान् अधिकारी माणसाकडे गेले होते. त्या गृहस्थांचें मत मूर्तिपूजेविरुद्ध होतें. ते गृहस्थ एका संस्थानाचे दिवाण होते. अर्थात् त्यांच्या घरीं त्या संस्थानिकांचीं मोठमोठीं छायाचित्रें लाविलीं होतीं. विवेकानंद त्या गृहस्थांकडे गेल्यानंतर त्या दिवाणसाहेबांनीं मूर्तिपूजा ह्या विषयावर आपलीं मतें त्यांच्यापुढें मांडून म्हटलें, "मूर्तिपूजा हा केवळ लोकांच्या अज्ञानाचा परिणाम आहे, नाहीं तर ते दगडाची पूजा

कशाला करतील? कोणताही दगड घ्यावयाचा, त्याची मूर्ति करावयाची आणि मग त्याची देव म्हणून पूजा करावयाची, हें अज्ञान आहे. ही साधी गोष्टही लोकांना कां पटूं नये हेंच समजत नाहीं."

विवेकानंद म्हणाले, "असंच केवळ म्हणतां येणार नाहीं. हा श्रद्धेचा प्रश्न आहे. लोक अडाणी म्हणून मूर्तिपूजा करतात हें म्हणणं बरोबर नाहीं. सामान्य जनता ही मोठमोठ्या साधुसंतांचं अनुकरण करीत आहे. ज्ञानेश्वर, तुलसीदास, तुकाराम, मीराबाई, वगैरे होऊन गेलेले साधुसंत अज्ञानी होते असं आपण कसं म्हणूं शकतां?"



विवेकानंदांनीं इतकें सांगितलें तरीही त्यांना तें पटेना. तेव्हां त्यांनीं भिंतीवर टांगलेलें संस्थानिकाचें एक छायाचित्र खालीं काढलें व म्हटलें, "हें चित्र मीं पायांखालीं तुडवलं व फाडलं तर तुम्हांला कसं वाटेल?"

"छे छे! मला फार वाईट तर वाटेलच, शिवाय रागही येईल. मला तें बिलकूल खपणार नाहीं."

"असं कां बरं? चित्राचा अपमान केला अगर तें फाडलं, तर राजेसाहेबांना कांहींही इजा होणार नाहीं. मग तुम्हांला असं कां वाटतं?"


" तें चित्र महाराजांचं आहे. त्यांच्याविषयीं माझ्या मनांत आदर आहे. चित्राचा अपमान तो त्यांचाच अपमान अशी माझी श्रद्धा आहे."

" मूर्तिपूजकांचीही तीच श्रद्धा असते. त्यामुळें त्यांना दोष देणं युक्त नाहीं."

आतां कोठें दिवाणसाहेबांना मूर्तिपूजेचें इंगित कळलें.

२४८३४
८९४
१८-३-५८

## ५. तीन प्रश्न



एका राजाकडे एक विद्वान् माणूस गेला आणि म्हणाला, " महाराज, आपल्या राजसभेंत अनेक पंडित आहेत. त्यांची मी परीक्षा पाहूं इच्छितों. माझ्या तीन प्रश्नांचीं उत्तरं त्यांनीं द्यावीं. जर कोणाला उत्तरं देतां आलीं नाहींत तर आपण मला ' अजिंक्यपत्र ' द्यावं."

राजानें त्याचें म्हणणें मान्य केलें. पंडितांच्या सभेला उद्देशून तो विद्वान् पाहुणा म्हणाला, " विद्वज्जन हो, ऐका माझे प्रश्न. आपण बरोबर उत्तरं दिलींत तर मी आपला पराजय झाला असं मान्य करीन. पण जर तुम्हांला ह्या माझ्या प्रश्नांचीं बरोबर उत्तरं देतां आलीं नाहींत तर तुम्हां सर्वांकडून मला विजयपत्र मिळावं."

" माझा पहिला प्रश्न असा आहे कीं पृथ्वीवरून आकाशाला पोचण्यासाठीं किती शिड्या पाहिजेत ? माझा दुसरा प्रश्न, पृथ्वीप्रदक्षिणा करण्यास किती वेळ लागेल ? आणि तिसरा प्रश्न असा आहे कीं असा प्राणी कोण कीं जो सकाळीं चार पायांनीं चालतो, दुपारीं दोनच पाय वापरतो पण सायंकाळीं तीन पायांचा उपयोग करितो ? "

पंडित लोक आपण शिकलेल्या शास्त्रांच्या आधारें ह्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याचा विचार करूं लागले. पण बराच वेळ विचार करूनही त्यांच्या चेहेऱ्यांवरचा गंभीरपणा कमी झाला नाहीं असें दिसलें; तसेंच प्रश्नांचीं उत्तरें देण्याची तयारी पण कोणाचीच दिसेना.

राजानें सहज प्रधानाकडे पाहिलें. प्रधानानें तरी उत्तरें देऊन आपल्या दरबाराची अप्रतिष्ठा थांबवावी अशी त्याची इच्छा होती. प्रधान म्हणाला, " महाराज, ह्यांचीं उत्तरं आपला चवरीधरही देईल ! "



राजाज्ञा होतांच चवरीवाला पुढें येऊन प्रणाम करून म्हणाला " महाराज, ऐका माझीं उत्तरं. पृथ्वीवरून आकाशाला पोचण्यासाठीं एकच शिडी पुरेल, मात्र ती तितकी उंच असली पाहिजे. सकाळीं

सूर्याबरोबर उठावं, त्याच्याच वेगानें चालावं, सायंकाळीं अस्ताला जावं अन् सकाळीं पुन्हा सूर्याबरोबर यावं म्हणजे चोवीस तासांत पृथ्वीप्रदक्षिणा करतां येईल ! माणूस सकाळीं म्हणजे अगदीं लहान असतांना रांगतो, दुपारीं म्हणजे मोठेपणीं दोन पायांनीं चालतो, सायंकाळीं म्हणजे वृद्धपणीं काठीचा तिसरा पाय उपयोगांत आणतो. ”

हीं उत्तरें ऐकतांच राजसभेंत टाळ्यांचा कडकडाट झाला !




## ६. बोलकी गुहा

एका जंगलांतील एका गुहेंत एक कोल्हा राहात असे. प्रत्यहीं रात्रीं तो शिकार करायला जाई आणि सूर्योदयाच्या सुमाराला तो आपल्या गुहेकडे परत येई. नित्याप्रमाणें एका सकाळीं गुहेजवळ आला तोंच गुहेच्या दारांतून आंत कोणीतरी श्वापद शिरलें आहे अशी त्याला शंका आली. गुहेच्या दारांतून आंत त्यानें निरखून पाहिलें तेव्हां त्याच्या लक्षांत आलें कीं सिंहाचीं पावलें तो गुहेंत शिरत आहे अशीं स्पष्ट उठलीं आहेत. पण तो बाहेर गेल्याचीं पावलें मात्र उठलेलीं नाहींत,

त्यामुळें कोल्हा मनांत घाबरला. आपल्या ह्या गुहेंत सिंह शिरला आहे असें त्याला वाटलें. आंत जाऊन पाहावें तर तो आपणावर झडप घालून गट्ट करील अशी त्याला भीति वाटली.

थोडा वेळ विचार केल्यावर त्याला एक युक्ति सुचली. त्या युक्तीनें आंत कोण आहे हें त्याला सहज कळून येण्यासारखें होतें. तो मोठ्या आवाजानें म्हणाला, "हे गुहे, आज किती वर्षं झालीं तुझी माझी मैत्री जमली त्याला! मी प्रत्यहीं परतल्यानंतर तूं मला हाक मारावी व माझं स्वागत करावं असा आपणांत करार झाला आहे. त्याप्रमाणें तूं आजपर्यंत मला हाक मारीत आलीस, मग आजच तूं मजशीं अबोला कां धरिलास मीं आतां इथें राहूं नये असं तुला वाटतं का? तूं मजवर कां रागावलीस? कृपा करून रोजच्याप्रमाणें मला हाक मार."

हें कोल्ह्याचें बोलणें आंत शिरलेल्या सिंहानें ऐकलें. तो सिंह आंत कोणी श्वापद शिरेल आणि आपण त्याला मारून खाऊं असा विचार करून त्या गुहेच्या मालकाची वाट पाहात होता. त्याला बाहेरच्या कोल्ह्याची चाहूलही लागली होती आणि तो हल्ला करण्याच्या तयारीनें




बसला होता. गुहा बोलत नाहीं तेव्हां तो कोल्हा आंत येणार नाहीं असें त्याला वाटलें आणि एक वेगळाच आवाज काढून सिंह कोल्ह्याला म्हणाला, "कोल्हेभाऊ, या ना आंत, मी तुमचीच वाट पाहात आहें. मी कांहीं रागावलें नाहीं. पण काल रात्रीं जागरण झाल्यामुळें सकाळींच डोळा लागला त्यामुळें तुम्ही येतांच मी तुमचं स्वागत करूं शकलें नाहीं; रागावूं नका; या, आंत या."

झालें! ही सिंहवाणी कोल्ह्यानें ओळखली. आपली गुहा गेल्याचें त्याला मोठें दु:ख झालें! तो मोठ्यानें ओरडत पळत सुटला. तो म्हणत होता, "अरे बापरे! ही गुहा म्हणजे एक डाकीणच आहे! ही बोलूं लागली! ऐका हो ऐका! आतां गुहा बोलूं लागल्या आहेत! माझ्या जन्मांत आज पहिल्यानेंच मीं गुहा बोलतांना ऐकली! तुम्ही कोणीं ऐकली नसेल! तरी सावध व्हा हो सावध व्हा!"

आपण स्वत: जिवंत निसटून त्या कोल्ह्यानें इतर वनचरांनाही जागें केलें!

## ७. गरीब म्हातारीचें स्मारक



कर्नाटकची राजकन्या मयणल्लदेवी ही गुजरातची राणी झाली. ती चतुर होती. बुद्धिमान् असून तिला शिक्षणही चांगलें मिळालें होतें. स्वभावानें ती धार्मिक व परोपकारी होती. ती चित्रकलेंत अतिशय निपुण

होती. गुजरातची राणी झाल्यानंतर तिचा मुलगा जयसिंह हा सुमारें दहा वर्षांचा असतांना त्याचे वडील राजे कर्णदेव ह्यांचा अंत झाला. त्यामुळें राणी मयणल्लदेवी हिलाच राज्यकारभार पाहावा लागला. ती हुशार आणि धोरणी राणी होती. राजाचें कर्तव्य काय ह्याची तिला पूर्ण जाणीव होती. प्रजाजनांच्या सुखसोयींसाठीं तिनें अनेक गोष्टी केल्या. गुजरातेंत पाऊस नियमित नसल्यामुळें पाण्याचा वारंवार दुष्काळ पडतो आणि लोकांना पाणी पिण्यासही मिळणें फार त्रासाचें होतें, हें जाणून तिनें ठिकठिकाणीं विहिरी व तलाव बांधविले. अनेक जागीं धर्मशाळा बांधविल्या. यात्रेकरूंवरील कर नाहींसे केले. प्रजाहिताचीं तिनें अनेक कामें केलीं, ह्यामुळें 'राजमाता मीनलदेवी' ह्या नांवानें जनता तिला मान देई.

धोलका शहरांत एक मोठा तलाव बांधावयाचा असें तिनें ठरविलें. त्याला योग्य अशी जागा तिच्या अधिकाऱ्यांनीं पसंत केली आणि तिनें स्वतः पाहून ती निश्चित केली. ह्या जागीं अनेक लोकांचीं घरें होतीं. त्यांचीं तीं घरें पाडावीं लागणार आणि त्यांचें नुकसान होणार हें लक्षांत घेऊन राणी मीनलदेवीनें त्या सर्वांना दुसऱ्या पसंत जागीं सरकारी खर्चानें घरें बांधवून देण्याचें आणि आणखी जरूर ती नुकसानभरपाई देण्याचें आश्वासन दिलें.

त्या जागीं एका गरीब बाईची एक झोपडी होती. इतरांप्रमाणें तिलाही नुकसानभरपाई मिळत असतां तिनें ती स्वीकारली नाहीं. आपली झोपडी आहे तिथेंच राहावी अशी तिची इच्छा, नव्हे हट्टच होता. अधिकाऱ्यांचें तिनें ऐकलें नाहीं म्हणून स्वतः राणीनें तिला बोलावून तिची समजूत करण्याचा प्रयत्न केला. तिच्या झोपडीमुळें तलावाची एक बाजू सरळ न होतां ह्या बाजूला एक खांच पडून तलावाची सर्व शोभा नाहींशी होईल असें सर्वांना वाटत होतें. अधिकारी तर बळजबरीनें तिची झोपडी मोडण्यास तयार झाले होते.

राणीच्या मुलाखतीला ती गेली. राणीनें तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला पण ती हट्ट सोडीना. तेव्हां शेवटीं राणीनें म्हटलें, " बाई,



तूं एवढी, गरीब, झोपडीची जागा मिळाली तर झोपडीच्या किंमतीच्या चौपट पैसा तुला मिळत असतां तूं तो कां घेत नाहींस ? आश्चर्य वाटतं मला ! " ती बाई म्हणाली, " माताजी, हा तलाव आपलं स्मारक होणार आहे. तुम्ही श्रीमंत. तुम्ही पैशांनीं कुठेंही स्मारक कराल ! पण मी कसं करणार ? पण ही तलावाची वाकडी बाजू पाहिली कीं लोकांना माझी आठवण होईल नि तेंच माझं स्मारक ! " राणीला तिचें बोलणें पटलें ! तिची झोपडी राहिली.

# ८. शहाणा उमेदवार




एका गृहस्थाची एक लाकडाची वखार होती. वखारींत बरेंच सरपण असे. वखार उघड्यावरच असल्यानें त्यांतील लाकूड चोरीला जाण्याचा संभव होता. इतकेंच काय पण एक दोन वेळां थोडें थोडें सरपण कोणींतरी नेलें असा मालकाला संशयही आला. त्यामुळें वखारीवर पहारा करण्यासाठीं एक रात्रीचा पहारेकरी नेमावा असें त्या गृहस्थानें ठरवून त्याप्रमाणें वर्तमानपत्रांत जाहिरातही दिली.

जाहिरात प्रसिद्ध होतांच त्याच्याकडे बरेच अर्ज आले. कितीतरी उमेदवार भेटायलाही आले. कित्येकांनीं ओळखीचीं पत्रेंही आणिलीं. एक आठवडाभर वाट पाहून आलेले अर्ज त्यानें एकत्र केले व त्या अर्जांवरून त्यानें दहा उमेदवार निवडले व त्या सगळ्यांना त्यानें मुलाखतीला बोलाविलें.


ठरल्या दिवशीं दहाही उमेदवार मुलाखतीसाठीं आले. एकेकाची त्यानें मुलाखत घेण्यास सुरुवात केली. प्रत्येकाचें नांव, गांव, शिक्षण, वगैरे माहिती विचारली. कामाचा अनुभव आहे काय ह्या प्रश्नाचीं उत्तरेंही त्याला मिळालीं ; पण मुलाखतीनंतर त्यानें कोणाचीच निवड केली नाहीं. कारण कोणताच उमेदवार त्याला पसंत पडला नाहीं. कोणाची शरीरयष्टि त्याला फार बारीक दिसली, तर कोणाची फार जाड दिसली. कोणी

छानछोकी म्हणून त्याला पसंत पडला नाहीं, तर कोणी फार ठेंगू म्हणून लायक नाहीं असें त्याला वाटलें. अशा रीतीनें दहाही उमेदवार त्यानें नापसंत केले व सर्वांना वाटेला लाविलें.



इतक्यांत एक इसम त्याला भेटावयास आला. त्यानें आपण नोकरीसाठींच आलों असें सांगतांच त्याची मुलाखत सुरू झाली. "तुमची प्रकृति कशी काय आहे?" हाही उमेदवार त्याला पसंत नव्हताच. उमेदवार म्हणाला, "माझी प्रकृति चांगली धडधाकड आहे पण तींत एकच दोष आहे." कोणता दोष आहे हें कळल्यानंतर त्या दोषासाठींच त्याला नको म्हणतां येईल ह्या विचारानें मालक म्हणाले, "कोणता दोष आहे तुमच्या प्रकृतींत?" उमेदवार म्हणाला, "मला रात्रीं झोप येत नाहीं!" मालक म्हणाले, "काय म्हणतां? रात्रीं तुम्हांला झोप येत नाहीं? मग असाच पहारेकरी मला पाहिजे आहे!" झालें! त्या उमेदवाराला नोकरी मिळाली हें सांगणें नलगे!

# १. भगवान् बुद्धाचा शांतपणा



भगवान् बुद्ध हे आपल्या धर्माचा प्रसार करण्यासाठीं गांवोगांवीं हिंडत असत. प्रत्येक गांवीं लोकांना ते उपदेश करीत. लोकभाषेंत केलेला उपदेश, त्यांचें पवित्र आचरण आणि तत्कालीन धर्मावरील उडत चाललेली श्रद्धा ह्यांमुळें बुद्धांना पुष्कळ अनुयायी मिळाले आणि थोड्याच काळांत त्यांचा धर्म चांगलाच भरभराटीला आला. त्यांच्या धर्मांत जातिभेद नव्हते, त्यामुळें नाना जातींच्या लोकांना एकत्र येऊन समतेनें वागण्याची संधि मिळे व उच्च म्हटल्या जाणाऱ्या जातींकडून होणारा अपमानही त्यांना सोसावा लागेनासा होई. त्यांचें आचरण इतकें पवित्र होतें कीं उच्च म्हणविल्या जाणाऱ्या जातींचे लोकही त्यांना शरण येऊन त्यांचें शिष्यत्व पत्करीत. तरुण शिष्यांचा मेळा त्यांच्याभोवतीं नेहमींच असे.

एका गांवीं ते आले असतां तेथील एका प्रसिद्ध विद्वान् पंडिताच्या मुलानें बुद्धाचें शिष्यत्व पतकरिलें व तो त्यांच्यापाशीं जाऊन राहिला! त्या ब्राह्मणाला फार राग आला. तो स्वतः बुद्धाकडे गेला व त्यानें बुद्धावर शिव्यांचा भडिमार केला. भगवंताभोवतीं शिष्यपरिवार होता त्यांतच त्या ब्राह्मणाचा मुलगा होता. एवढ्या मोठ्या सत्पुरुषाला विनाकारण अपशब्द बोलूं नका

असें त्या मुलानें व इतर शिष्यांनीं ब्राह्मणाला परोपरीनें सांगितलें पण व्यर्थ ! त्याचा राग अधिकच भडकला !



शेवटीं बुद्धच त्यांना म्हणाले, " आचार्य, आपल्याकडे कधीं पाहुणे मंडळी येतात का ? " लागलीच रागानें उसळून तो ब्राह्मण म्हणाला, " येतात म्हणजे ! मी काय तुझ्यासारखा गोसावडा आहें ! मी घरंदाज माणूस आहें. मजकडे पाहुणे येणारच ! "

" आचार्य, मग आपण त्यांचा पाहुणचार करून त्यांना कांहीं वस्तु भेटीदाखलही देत असाल नाहीं ? "

" हें काय विचारतोस ? पाहुण्याच्या लायकीप्रमाणें त्याचा आदर-सत्कार करणं आणि त्याला भेट देणं हें गृहस्थाचं कर्तव्य नाहीं का ? "

" पण समजा, एखाद्याला दिलेली भेट त्यानें स्वीकारली नाहीं तर ती तुम्हांलाच राहात असेल नाहीं ? "

" ह्यांत काय संशय ! मींच दिलेली वस्तु माझीच राहाते ह्यांत नवल तें कोणतं ? "

" ठीक ठीक ! आचार्य, आज मी तुमच्याकडे पाहुणा म्हणूनच आलों होतों. अन् तुम्हीं पण त्या गलिच्छ शिव्यांची भेट मला दिली. आभारी आहें मी आपला. पण ही भेट मला स्वीकारतां येत नाहीं ह्याबद्दल दिलगिरी वाटते ! आतां ही तुमची भेट तुम्हांलाच राहिली बरं !"

आचार्यांचा चेहेरा पाहाण्यासारखा झाला !

## १०. चोरी पकडणारा बैल




एकदा वर्तमानपत्रांत अशी बातमी आली कीं सिन्नर गांवीं असा एक बैल आहे कीं तो चोरीचा शोध लावतो. त्याला मोकळा सोडून 'तूं चोराचा शोध कर' असें म्हणतांच तो नेमका चोराजवळ जाऊन उभा राहातो. ही बातमी वर्तमानपत्रांत यायला आणि आमच्या गांवीं चोरी व्हायला एकच गांठ पडली. गांवचे प्रसिद्ध व्यापारी जनूभाऊ ह्यांच्या दुकानांतून पांच हजार रुपयांच्या नोटा एका रात्रीं नाहींशा झाल्या ! ह्या चोरीचा पत्ता कसा लावावा हेंच जनूभाऊंना कळेना. पोलिसांत वर्दी द्यावी तर त्यांचा पूसतपास, कोर्टकचेरी, पुरावे, केवढा मोठा त्रास ! तेव्हां पोलिसांत फिर्याद द्यावयाची नाहीं, असें त्यांनीं मनाशीं ठरविलें. त्यांच्या

एका मित्रानें त्यांना वर्तमानपत्रांत आलेली सिन्नरच्या बैलाची हकीकत वाचून दाखविली. "हा बैल आपल्याला मिळाला तर ?" असें त्यांचा मित्र त्यांना म्हणाला. जनूभाऊ म्हणाले, "अहो, माझा ह्या गोष्टीवर विश्वासच नाहीं. बैल चोरी शोधून काढील हें संभवत नाहीं. तरीपण ही बातमी मात्र फार उपयोगी आहे. ह्या बातमीचा योग्य उपयोग केला तर मात्र आपली चोरी उघडकीस येईल."

त्यांनीं दुकानांत येणाऱ्या प्रत्येक माणसाला ती बातमी सांगण्यास सुरुवात केली आणि त्याबरोबरच आपली चोरी पकडण्यासाठीं आपण तो बैल मागविणार आहों असेंही जाहीर केलें. त्यांच्या दोन–चार मित्रांनीं तर ही बातमी गांवभर होईल अशी व्यवस्था केली.

एक दोन दिवसांतच त्यांनीं आपला एक नोकर सिन्नर गांवीं पाठविला. आणखी दोन दिवस गेले नाहींत, तोंच त्यांचा मुनीम एक बैल घेऊन परतही आला. तो बैल आला ही गोष्ट सर्वांनीं प्रत्यक्ष पाहिली. त्यामुळें गांवांत सगळीकडे पुढें काय होतें, अशी उत्सुकता दिसून आली. सायंकाळच्या सुमारास त्या बैलाची पूजा करून त्याला फुलांचे हार घालण्यांत आले आणि सकाळींच त्याला चोरी पकडण्यासाठीं सोडावयाचें असें ठरलें आणि ही वार्ता सर्वतोमुखीं झाली.

उजाडतें कधीं आणि आपण बैलाची करामत पाहातों कधीं, असें प्रत्येकाला झालें. दुकानावरील नोकर दुकान उघडण्यासाठीं गेला. दुकानाच्या कुलुपापाशीं त्याला एक पुरचुंडी दिसली. ती पाहातो तों आंत पांच हजारांच्या नोटा ! झालें, नोकर धावतच मालकांना ही गोष्ट सांगावयास गेला. बैलाची करामत पाहण्यासाठीं गांवकरी तिकडे जमतच होते. आतां बैल सुटेल असें त्यांना प्रत्येक क्षणाला वाटत होतें व जो तो उत्सुकतेनें बैल सुटण्याची वाट पाहात होता.



तोंच जनूभाऊ बाहेर आले व म्हणाले, "लोक हो! हा पाहा बैलाचा पराक्रम! चोरानें रात्रीं नोटा फडक्यांत बांधून ती पुरचुंडी दुकानाबाहेर ठेवली होती!"

खरोखर तो बैल सिन्नरचा नव्हताच! जनूभाऊंनीं हें केवळ नाटक केलें होतें! त्यांची युक्ति मात्र सफळ झाली.

# ११. शहाणा वझीर



एका देशांत एक सुलतान होता. तो अत्यंत जुलमी होता. प्रजेला नाना प्रकारें छळण्यांत त्याचा हातखंडा होता. प्रजेचें सर्वस्व् नाडल्यामुळें लोक त्याचें राज्य सोडून जाऊं लागले, त्यामुळें कितीतरी गांवें ओसाड पडलीं. पण सुलतानाला त्याची काय पर्वा ? प्रजेकडून करांचें ओझें वसूल करून चैन करणें एवढेंच त्याला माहीत होतें.

त्याचा वझीर मोठा चतुर होता. सुलतानाला खरी हकीकत कळावी व त्यानें जुलूम करण्याचें सोडून द्यावें असें त्याला वाटे. पण आपण त्याला तसें सांगितलेलें आवडणार नाहीं, "तुम्ही जुलुमी आहां!" असें सरळ सांगितलें तर तो आपल्यालाच शिक्षा करील अशी भीति त्याला वाटे. म्हणून त्यानें एक युक्ति केली.

एके दिवशीं सुलतानसाहेब खुषींत आहेत असें पाहून वझीर म्हणाला, "गरीब परवर, काल रात्रीं मोठी गंमत झाली. माझ्याकडे एक फकीर आला आणि तो रात्रीचा वसतीला राहिला. रात्रीं बराच उशीर होईपर्यंत त्यानें अल्लाची थोरवी गाइली. मध्यरात्रीच्या सुमारास आमच्या घराजवळच्या बागेंतील आंब्याच्या झाडावर दोन घुबडं येऊन बसलीं व तीं कांहीं बोलूं लागलीं. त्या फकीरसाहेबांना घुबडांची भाषा येत होती. ते काळजीपूर्वक




त्यांचं बोलणं ऐकूं लागले. तीं घुबडं उडून गेल्यावर ते म्हणाले, 'ऐकलंत हीं घुबडं काय म्हणतात तें?' मला फार आश्चर्य वाटलें व मीं म्हटलं, फकीरसाहेब, आम्हांला कोठें ती भाषा समजते? आपणच सांगा ना घुबडं काय म्हणालीं तें.

फकीरसाहेब म्हणाले, "अहो त्या दोन घुबडांनीं आपल्या मुलामुलीचं लग्न ठरवलं! ह्या मोठ्या आंब्यावर बसला होता तो वराचा बाप होता. त्या धाकट्या आंब्यावरचा वधूपिता होता. वरपित्यानें वधूला मागणी घालतांच तिच्या पित्यानें हुंड्याची मागणी केली. तो म्हणाला — निदान शंभर उध्वस्त खेडीं तूं मला द्यावींस. वरपिता लागलीच म्हणाला — ऊं:, त्यांत काय मोठंसं! आमचे सुलतानसाहेब निदान एक वर्ष जरी जगले तरी शंभरच काय पण दोनशें उजाड खेडींही मी तुला देऊं शकेन! अल्लानें सुलतानसाहेबांना भरपूर आयुष्य मात्र द्यावं! अशा रीतीनें लग्न ठरवून तीं दोन्ही घुबडं निघून गेलीं. त्यांनीं जातां जातां आपल्याला पुन्हा एकदा दीर्घायु द्यावं अशी अल्लाची प्रार्थना केली!"

वझीरानें सुलतानसाहेबांकडे पाहातांच आपलें काम झालें अशी त्याची खात्री पटली.

# १२. जादूगार




मार्क ट्वेन ह्या विनोदी लेखकाची एक गोष्ट सांगतात. वर्तमानपत्राचा बातमीदार, व्याख्याता आणि विनोदी लेखक ह्या नात्यांनीं तो पुष्कळ लोकांना परिचित असल्यानें वेगवेगळे समारंभ, सभा, व्याख्यानमाला अशा प्रसंगीं त्याला निमंत्रणें येत आणि तोही मोठ्या आनंदानें अशा आमंत्रणांचा स्वीकार करी. आपल्या विनोदी भाषणानें आणि वागण्यानें जमलेल्या सर्व मंडळीला हसविल्यावांचून तो राहात नसे.

एकदा एका श्रीमंत गृहस्थाकडे मार्क ट्वेन व त्याचा एक मित्र ह्यांना उपाहारासाठीं निमंत्रण आलें. त्याचा स्वीकार करून दोघे मित्र योग्य वेळीं त्या गृहस्थाच्या बंगल्यांत हजर झाले. दारांतच त्यांचें यथोचित स्वागत झालें. नमस्कार, चमत्कार, ओळख वगैरे संपल्यावर सर्वांना दिवाणखान्यांत नेलें. तेथें मध्येंच खूप मोठें टेबल ठेवलें होतें. त्यावर किती तरी चांदीच्या सुंदर बशा मांडून त्यांत खमंग पदार्थ वाढलेले होते. त्या पदार्थांच्या खमंग वासानें कोणाच्याही तोंडाला पाणी सुटावें ! टेबलावर ठिकठिकाणीं मोठ्या फुलदाण्या ठेवून त्यांत नाना रंगांचीं लहानमोठीं आणि सुवासिक फुलें भोवतालच्या कोमलपल्लवांसह चातुर्यानें खोंचलीं होतीं. तें सगळें दृश्य पाहून त्या दोघा मित्रांना आनंद वाटला. ते खमंग पदार्थ,

त्या चकचकीत ताटल्या, मनोहर फुलदाण्या आणि त्यांतलीं सुंदर फुलें ह्या सगळ्यापेक्षां मार्क ट्वेनचे डोळे खाण्याच्या ताटल्यांत ठेवलेल्या त्या चकचकीत रुप्याच्या चमच्यांकडे वेधले. असले चमचे आपल्याजवळ असावेत असेंच त्याला वाटूं लागलें.

सर्व पाहुणे टेबलापाशीं बसले आणि फराळाला सुरुवात झाली. थट्टा, विनोद आणि गप्पा ह्यांना तर जणूं पूरच आला. मार्क ट्वेनचें सारें लक्ष त्या चमच्यांवर होतें. त्याच्या शेजारींच त्याचा मित्र बसला होता. त्याला तो म्हणाला, "किती सुंदर आहेत हे चमचे! ह्यांतून दोन मीं जर खिशांत घातले तर कुणाला कळणार आहे तें!" त्याचा मित्र हसला व हळूच म्हणाला, "तूं अजून विचारच करीत आहेस पण हा विचार मीं केव्हांच कृतींत आणला आहे!" मार्क ट्वेननें त्याच्या खिशाला हात लावून चाचपून आपली खात्री करून घेतली! आपल्यावर आपल्या मित्रानें मात केली ह्याचें त्याला वाईट वाटलें!

फराळ संपला. सर्व निमंत्रित पाहुणे यजमानाचे आभार मानून निरोप घेण्याच्या विचारांत होते. त्या वेळीं मार्क ट्वेन मित्रापासून दूर जाऊन



दिवाणखान्याच्या दाराशीं उभा राहिला व म्हणाला, "मित्र हो, मी तुम्हांला एक जादूचा प्रयोग दाखविणार आहें. मात्र तो संपतांच एक क्षणभरही मी तुमचा वेळ घेणार नाहीं." नंतर टेबलावरचे दोन चमचे हातीं घेऊन तो म्हणाला, "हे पाहा दोन चमचे. हे मी माझ्या खिशांत ठेवतों. आतां पाहा हां जादू!" त्यानें थोडे हातवारे केले! हुं फूं करून कांहीं मंत्र पुटपुटल्यासारखें केलें व म्हटलें, "चले जाव." नंतर तो मित्राकडे वळून त्याच्याकडे बोट दाखवून म्हणाला, "पाहा पाहा, ते चमचे ह्यांच्या खिशांत गेले!" असें म्हणून तो तडक घराबाहेर सटकला! मित्राला मात्र खिशांतून चमचे काढून दाखवून त्याच्या जादूची वाहवा करावी लागली!



## १३. पानपट्टीवाला दरबारी झाला

• बिरबल चौदा पंधरा वर्षांचा असतांनाच त्याचे आईबाप वारले. घरांत पांचपन्नास रुपयेही नव्हते. तरी बिरबल रडत बसला नाहीं कीं घाबरला नाहीं. जवळ जे थोडेफार पैसे होते ते खर्चून त्यानें एक पानपट्टीचें दुकान काढलें. त्या वेळीं बादशाहा अकबर दिल्लीला न राहातां आग्रा येथील किल्ल्यांत राहात असे. किल्ल्याच्या बाहेर रस्त्यावरच त्यानें आपलें दुकान थाटलें होतें. बिरबलचें शिक्षणही फारच थोडें झालें होतें. तरीही तो सरस्वतीची मनोभावें प्रार्थना करी.

एके दिवशीं तो दुकानांत बसला असतां एक मुसलमान त्याच्याकडे आला व 'पाव शेर' चुना मागूं लागला. बिरबलनें विचारलें, "हा इतका चुना कशाला पाहिजे?" तो म्हणाला, "शहानशाह अकबर ह्यांची तशी आज्ञा झाली आहे." ह्यावर बिरबलनें त्याची विचारपूस केली तेव्हां त्याला कळलें कीं तो इसम बादशाहाच्या नोकरींत असून बादशाहाला पानपट्टी करून देण्याचें काम त्याच्याकडे होतें. तें काम तो पंधरावीस वर्षें करीत होता. बिरबल म्हणाला, "आश्चर्य आहे! इतकीं वर्षें हें काम करीत असून तुम्हांला तें बरोबर करतां येऊं नये!" त्यावर त्या नोकरानें म्हटलें, "हें तूं कशावरून म्हणतोस?" "ह्या तुझ्या चुन्याच्या मागणीवरून." बिरबलनें पुढें म्हटलें, "तूं बादशाहाला काल विडा दिलास त्यांत चुना थोडा जास्त होता, त्यानें शहानशहाचं तोंड पोळलं. त्यावरून बादशहाची तुझ्यावर नामर्जी झाली आहे! तूं पावशेर चुना नेलास कीं बादशाहा तुझ्याकडून तो खावबील अन् तूं नाहक मरून जाशील! मला वाटतं, हा चुना घेऊन जातांना स्वत:साठीं कफनही विकत घेऊन ठेव!"

बिरबलचें हें बोलणें ऐकून तो नोकर आश्चर्यचकितच झाला. एवढासा पट्टीवाला आणि केवढें त्याचें चातुर्य! मग आपण मरणार तर! ह्या विचारानें खिन्न होऊन त्यानें विचारलें, "पण कायरे, तूं एवढा चतुर मग ह्या संकटांतून माझी सुटका कशी होईल, हेंही तुलाच सांगतां येईल, नाहीं?" बिरबल म्हणाला, "ऊं:! त्यांत काय मोठंसं! एक शेर तूप विकत घे आणि बादशाहाला पट्टी द्यायला जातांना तें पिऊन जा." नोकरानें चुना व तूप विकत घेतलें. दुसऱ्या दिवशीं पट्टी देण्याला जाण्यापूर्वी तो तें तूप प्याला. बादशाहापुढें तो जातांच 'चुना आणला आहे का?' अशी चौकशी करून त्यानें म्हटलें, "चुना जास्त लावला कीं काय होतं हें तुला कळलं पाहिजे. ह्यासाठीं तो सर्व चुना इथें बसून खाऊन टाक!"

बादशाहाचा हुकूम तो ! मोडला तर लागलीच शिरच्छेद ठेवलेला ! नोकरानें घाबरून तो सर्व चुना खाल्ला व तो निघून गेला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पान देण्याच्या वेळीं तो नोकर पानदान घेऊन हजर झाला ! त्याला पाहून बादशाहाला आश्चर्य वाटलें. "इतका चुना खाऊन तूं जगलास तरी कसा ?" असें त्याला बादशाहानें विचारलें. दोन्ही हात जोडून घाबरत घाबरत त्या नोकरानें आदल्या दिवशीं घडलेली सर्व हकीकत बादशाहाला निवेदन केली ! बादशाहानें त्या दुकानदार मुलाला बोलावून आणलें !



त्याचें बालवय पाहून तर बादशाहा विस्मित झाला. त्याच्या बुद्धिमत्तेविषयीं त्याला आश्चर्य वाटलें. आपल्या दरबारांत त्यानें बुद्धिमान् व विद्वान् अशा आठ सद्‌गृहस्थांना दरबारांतील रत्नें म्हणून नेमिलें होतें. ह्या मुलाची नववें रत्न म्हणून दरबारांत नेमणूक झाली. बिरबलच्या शहाणपणाच्या अनेक गोष्टी प्रचलित आहेत.

# १४. राजा भोज निरुत्तर झाला



राजा भोज आणि त्याच्या दरबारचीं बुद्धिमान् रत्नें ह्यांच्या शहाणपणाबद्दल कुणाला शंका येईल ? पण ऐका, एका वृद्धेनें त्यांना कसें जिंकलें तें.

राजा भोज आणि राजकवि माघ एके दिवशीं फिरावयास निघाले. दोघेही कवि आणि रसिक. काव्यरसास्वादाच्या गप्पा मारतां मारतां आपण शहरापासून किती लांब आलों अन् किती वेळ झाला ह्याचें त्यांना भान राहिलें नाहीं. सायंकाळ झाली आणि लवकरच अंधार पडला. रस्ता दिसेनासा झाला आणि ते वाट चुकले. काळोखामुळें त्यांना दिसेना आणि कोणत्या मार्गानें गेलें तर राजधानीला परत जाऊं हें त्यांना कळेना. पण काय करणार ? आजूबाजूला घर दिसेना कीं कोणी माणूस भेटेना. आणखी थोडा वेळ भटकल्यावर एका झोपडीपाशीं ते पोंचले. तेथें जातात तों त्यांना एक वृद्ध स्त्री भेटली. त्यांनीं वेषांतर केलें होतें आणि आपण कोण हें कोणालाही सांगण्याची त्यांची इच्छा नव्हती. झोपडींतील वृद्ध स्त्रीला ते म्हणाले, "बाई, हा समोरचा रस्ता कुठें जातो ?" वृद्धा म्हणाली, "बाबांनो, रस्ता कुठें जातो हें प्रवाशांना माहिती. मला रे हें कसं कळणार ? पण आपण कोण ?" ते म्हणाले, "आम्ही यात्रेकरू आहों." ती वृद्धा म्हणाली, "यात्रेकरू ? ह्या सृष्टींत तर दोनच यात्रेकरू आहेत

२७८३४



आणि ते म्हणजे चंद्र आणि सूर्य! आपण चंद्रसूर्य तर नाहीं!" "तसं नव्हे. आम्हांला क्षणिक अतिथि समजा." असें दोघांनीं तिला म्हटलें. "असं कसं समजूं?" ती वृद्धा म्हणाली, "धन आणि यौवन हे खरे क्षणिक अतिथि. ते तर आपण नाहीं!" भोजराजानें जरा अहंकारानें म्हटलें, "आम्ही राज्यपालक आहों." "इन्द्र आणि यम ह्यांना राज्यपालक म्हणतां येईल! आपण तर ते खास नाहीं." ती वृद्धा म्हणाली.

"बरं तर मग, आम्हांला सहन करणारे माना आजीबाई." कविराज माघ म्हणाले. "असं कसं मानूं? कारण सहन करण्याचं काम भूमि आणि स्त्री ह्यांचं!" वृद्धेनें उत्तर दिलें.


"आम्ही परदेशी आहों हें तर तुम्हांला खरं वाटेल?" राजा म्हणाला. "कसं खरं वाटेल बरं? जीवात्मा आणि मोत्यांचं पाणी ह्या दोनच गोष्टी परदेशी असूं शकतात." वृद्धा म्हणाली.

"आम्ही समर्थ आहों." पुन्हा भोजराजानें म्हटलें.

"छे, छे. तसं नाहीं म्हणतां येणार; कारण सामर्थ्य देण्याचं काम अन्न आणि पाणी हीं करतात. त्यांनाच समर्थ म्हणतां येईल." शेवटीं

माघ अजीजीनें म्हणाला, "बाई, तुमच्यापुढें आम्ही हरलों." बाई म्हणाली, "हार जाणं हें कर्जदार आणि मुलीचा बाप ह्यांनाच शोभतं; दुसरा कोणी हार जाणार नाहीं. तरीपण तुम्ही कोण तें तर सांगा, म्हणजे मग तुम्हांला काय पाहिजे तें मी पाहीन." वृद्धा बोलली. कवि माघ म्हणाले, "आजीबाई, हे आहेत महाराज भोज आणि मी आहें माघ. आम्हांला राजधानीचा रस्ता दाखवतां का?"

"अं! त्यांत काय मोठंसं. हा रस्ता दिसतो त्यानें पुढें व्हा कीं राजधानीला पोचाल!" त्या वृद्धेनें रस्त्याकडे बोट दाखवीत म्हटलें.




## १५. सडेतोड उत्तर

इंग्रजी अम्मल हिंदुस्थानांत नुकताच सुरू झाला होता. इंग्रज माणूस, इंग्रजी चालीरीती व इंग्रजी पोषाख ह्यांनीं हिंदी माणसांचे डोळे दिपून गेले होते. इंग्रजांचें वैभव हेंच परमेश्वरी वैभव असें त्यांस वाटूं लागलें होतें. त्यामुळें इंग्रज माणसाला भलतेंच महत्त्व प्राप्त झालें होतें. इंग्रजी मनुष्य कितीही थोडें शिकलेला असो, त्याला हिंदुस्थानांत मोठ्या पगाराची नोकरी सहज मिळे. त्याच्या बरोबरीनें काम करणाऱ्या हिंदी माणसाला इंग्रजी

माणसाच्या पगाराच्या दशांशही पगार मिळत नसे! इंग्रजी विद्येपुढें तर सर्वच विद्या तुच्छ लेखल्या जात.

अशा ह्या प्रतिकूल कालांतही अनेक हिंदी लोक आपल्या बुद्धिमत्तेनें पुढें आले. कित्येकांनीं इंग्रजी भाषाही आत्मसात् केली आणि इंग्रज सरकारच्या राज्यांत मोठमोठ्या नोकऱ्याही मिळविल्या. हिंदी लोकही जबाबदारीचीं कामें करायला लायक आहेत असें कित्येकांनीं आपल्या कामानें सिद्ध केलें. असें जरी होतें तरी इंग्रज माणसें मात्र हिंदी माणसाला फार कमी लेखीत ! त्यांची विद्या फुकट, त्यांच्या चालीरीती मूर्खपणाच्या, धर्म तर शुद्ध पाखंड असें ते समजत आणि त्यांना अपमानानें वागवीत. त्यांचा पोषाख, जेवणाची पद्धति वगैरेंची ते थट्टा करीत. हिंदी जनता ही अजून रानटी अवस्थेंत आहे असें त्यांना वाटे आणि त्यामुळें ते हिंदी माणसांचा वेळीं अवेळीं पाणउतारा करीत.


त्या काळीं बंगाल्यांत पंडित विद्यासागर नांवाचे एक विद्वान् आणि परोपकारी गृहस्थ होऊन गेले. आपल्या बुद्धिमत्तेनें आणि विद्वत्तेनें सरकारी उच्च दर्जाची नोकरी त्यांनीं मिळविली. समाजसुधारणा करण्यासाठींही ते खूप झटले. त्यांनीं अनेकांना मदत केली. ते एकदा आगगाडीच्या प्रवासाला



निघाले. गाडींत खूप गर्दी होती म्हणून त्यांनीं दुसऱ्या वर्गाचें तिकीट काढलें. डब्यांत एकही बाक अजिबात रिकामें असें नव्हतें. एका मोठ्या बाकावर दोन इंग्रज गृहस्थ दोन टोकांना बसले होते. त्यांच्यामध्यें ते जाऊन बसले. हिंदी माणूस आपल्याजवळ बसला हें त्यांना आवडलें नाहीं. त्यांना खूप राग आला. त्यांपैकीं एक दुसऱ्याला इंग्रजींत म्हणाला, " अगदीं गाढव आहे हा माणूस ! " दुसरा म्हणाला, " गाढव ? छे छे. मला वाटतं हा शुद्ध डुकर आहे ! " पंडित विद्यासागर ह्यांना इंग्रजी येत होतें. ते शांतपणें म्हणाले, " छे हो, मी मात्र त्या दोघांत आहेंसं वाटतं ! "

इंग्रज माणसांचे चेहेरे पाहाण्यासारखे झाले !


## १६. दोन खलाशी



एका बंदरांत खलाशी लोकांची बरीच वस्ती होती. एका खलाशाला खूप दूरदूरचे प्रवास करण्याची संधि मिळाली. त्यानें गलबतांतून अनेक देशांच्या सफरी केल्या. ह्या निमित्तानें त्यानें चीन, लंका, इराण, अरबस्तान वगैरे नाना देश पाहिले होते. तो घरीं असतांना त्याचे अनेक मित्र त्याला भेटावयास येत. आपण पाहिलेल्या अनेक चमत्कारिक गोष्टींची माहिती


तो त्यांना मोठ्या अभिमानानें सांगे. असें करतां करतां त्याला प्रत्येक गोष्ट अतिशयोक्तीनें सांगण्याची चटक लागली.

एकदा तो सांगू लागला, "चीन देशांत मी एक राक्षसी कोबीचा कांदा पाहिला. केवढा मोठा होता आहे माहीत? त्या कांद्याच्या पानाच्या छायेंत शंभर-दीडशें घोडेस्वार सहज उभे राहात असत." हें ऐकून सर्वांना फार फार आश्चर्य वाटलें. कांहींना तर तो केवळ थापाच मारीत आहे असें वाटलें. एकानें तर त्याला तसें उघड बोलूनही दाखविलें. तो म्हणाला, "काय हो, खरं सांगतां हें? मला नाहीं खरं वाटत! अन् काय हो, एवढा मोठा कांदा काढायला माणसं तरी किती लागत असतील? अन् तो काढतील तरी कसा? छे, विश्वास नाहीं बसत ह्या तुमच्या सांगण्यावर." पण दुसरा एक खलाशी म्हणाला, "अहो, असं कसं म्हणतां? हे कशाला खोटं सांगतील? चीन देशच मुळीं केवढा मोठा आहे! त्यांत एवढ्या मोठ्या वस्तु असायच्याच. मी नुकताच चीनला जाऊन आलों! चीन तो चीन! त्यांतली ती भिंत केवढी मोठी आहे! ती सुद्धा एक नवलच आहे! मींसुद्धा कांहीं नवलाईच्या गोष्टी त्या देशांत पाहिल्या आहेत, समजलं!"



पहिला खलाशी म्हणाला, "मग सांगा पाहूं एखादी नवलाई." आतां ह्या दुसऱ्या खलाश्यालाही स्फुरण चढलें! डोळे मिचकावीत तो म्हणाला, "मी नुकताच तिकडून आलों. एका गांवांत एका तांबटाकडे एक मोठी कढई करण्याचं काम चाललं होतं. कढईच्या आंत पन्नास माणसं बसून ठोकीत होतीं. बाहेरच्या बाजूनें तर सुमारें शंभर मजूर ठोकीत होते! केवढी मोठी कढई होती कल्पना करा. हें आपलं सगळं गांव आंत सहज बसूं शकलं असतं!" सगळे खलाशी त्या खलाश्याकडे आश्चर्यानें पाहूं लागले. कोबीची नवलाई सांगणाराला वाटलें कीं ह्यानें तर आपल्यावरही मात केली. थोडासा रागानें तो म्हणाला, "पण काय हो, एवढी कढई ते कशासाठीं करीत होते? आपला नाहीं विश्वास बसत ह्या गोष्टीवर!" दुसरा खलाशी शांतपणें म्हणाला, "तुमच्या नाहीं ध्यानांत आलं अजून? तुम्हीं तो कोबीचा प्रचंड कांदा पाहिलात ना? त्याची भाजी करण्यासाठीं एवढी मोठी कढई नको का?"

दोघांचींही तोंडें बंद झालीं!



## १७. आंबे काय म्हणाले ?


भगवंतराव ह्या नांवाचे एक श्रीमंत गृहस्थ होते. त्यांना आनंद नांवाचा एकुलता एक मुलगा होता. आनंद दिसायला सुंदर आणि बोलायला गोड असा मुलगा होता. थोडा मोठा होतांच भगवंतरावांनीं त्याला शाळेंत घातलें. पहिल्यापहिल्यानें तो चांगला वागत असे. नियमित शाळेंत जाई, आपला अभ्यास पण करी आणि सर्वांशीं चांगल्या रीतीनें वागे. त्याच्या नम्र वागणुकीनें त्याच्या गुरुजींचीही त्याच्यावर मर्जी बसली.

पण एक दोन वर्षांतच त्याच्या वागणुकींत फरक पडला. तो वेळच्या-वेळीं शाळेंत जाईनासा झाला. त्याचा अभ्यासही नीट होत नव्हता. मुलांच्या खोड्या केल्याच्याही तक्रारी येऊं लागल्या. गुरुजी त्याला वारंवार बोलूं लागले. होतां होतां ह्या तक्रारी भगवंतरावांकडे आल्या. त्यांनीं त्याला उपदेश करून ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न केला; पण व्यर्थ ! त्याला त्यांनीं शिक्षाही देऊन पाहिली पण तिचाही कांहीं उपयोग होईना ! त्यांचा तो एकुलता एक मुलगा असल्यानें त्याला जबर शिक्षा करण्याचेंही त्यांना साधणें शक्य नव्हतें. भगवंतराव मोठ्या फिकिरींत पडले. आनंदाला कसा ताळ्यावर आणावा हें त्यांना सुचेना. त्यांचे एक मित्र होते. त्यांना त्यांनीं

सव माहिती सांगून म्हटलें, " नामदेवराव, सांगा पाहूं कांहीं युक्ति आनंदाला सुधारण्याची. "

आणखी थोडे प्रश्न विचारून नामदेवरावांनीं माहिती काढली त्यावरून त्यांच्या लक्षांत आलें कीं आनंद हा केवळ वाईट मुलांच्या संगतीनें बिघडला आहे ; पण ती गोष्ट त्यांना पटली नाहीं. थोडा वेळ विचार करून ते म्हणाले, " भगवंतराव, आज संध्याकाळीं तुम्ही आनंदाला पन्नास उत्तम आंबे देऊन त्यांची आढी घालावयास सांगा. त्या पन्नास आंब्यांवर एकच कुजलेला आंबा त्याला ठेवूं द्या आणि नंतर एक दोन दिवसांनीं त्याला ती आढी उघडून पाहाण्यास सांगा. तें पाहिल्यावर आनंद ताळ्यावर आलाच पाहिजे. "

भगवंतरावांनीं सायंकाळींच पन्नास आंबे विकत घेतले व आनंदाकरवीं त्यांची आढी घातली. एक खराब आंबाही त्यांवर ठेवून दिला व म्हटलें, " आनंदा, हे पन्नास आंबे उत्तम आहेत. हा एकच जरा खराब आहे. पाहूं आपण हे आंबे केव्हां पिकतात तें ! " झालें. आनंदानें दुसऱ्या दिवशीं पाहिलें तों चारपांच आंबे कुजले होते. आणखी एक दिवस जाऊं देऊन



पाहिलें तों दहा बारा आंबे कुजले आहेत असें दिसलें. भगवंतराव त्याल म्हणाले, "पाहिलंस, एका वाईट आंब्यानें किती आंबे वाईट केले ते!"

आनंद मनांतल्या मनांत समजून चुकला. तो वडिलांना म्हणाला, "बाबा, मी आतां वाईट मुलांची संगति सोडून देईन. ह्या आधीनेंच मला सांगितलं आणि तें मला पटलं. मला क्षमा करा. मी पुन्हा गैरवर्तन करणार नाहीं."



## १८. बदललेली पृथ्वी

एकदा एक राजा आपल्या मंत्र्यासह अश्वरथांत बसून चालला होता. रथ हाकणारा सारथी बराच जुना नोकर होता आणि आपल्या कामांत तरबेज होता. त्या वेळीं नवीनच घोडे रथाला जोडले होते आणि ते कसे काय चालतात हेंही पाहावयाचें होतें. सारथ्याच्या कौशल्याचीच त्यांत परीक्षा होणार होती.

घरच्या कांहीं भानगडीमुळें आज सारथ्याचें मन कामावर नव्हतें आणि रथाला घोडे तर नवीन होते. शहराबाहेर जाईपर्यंत जेमतेम त्यानें घोडे नीट रस्त्यानें नेले. लवकरच ते घोडे उधळूं लागले आणि त्यांना ताब्यांत ठेवणें सारथ्याला कठीण जाऊं लागलें. थोडक्याच वेळांत घोड्यांनीं रस्ता

सोडला. रथ वेगानें जाऊं लागला आणि लवकरच एका झाडावर तो आपटला! त्यामुळें रथ थांबला. राजा व मंत्री खालीं उतरले! आपण आपलें काम आज बरोबर करूं शकलों नाहीं ह्याची जाणीव सारथ्याला झाली. आपल्या चुकीबद्दल आपल्याला शिक्षा होणार ह्या विचारानें तो घाबरला.

राजेसाहेब रागावलेच होते. इतकीं वर्षें घोडे हाकणाऱ्या अनुभवी सारथ्याला गाडी नीट हाकतां येऊं नये ह्याचा त्यांना खेद वाटला!

इतक्यांत तो सारथी रथांतून उतरला आणि राजेसाहेबांना नम्रपणें मुजरा करून म्हणाला, "महाराज, गरिबावर राग नसावा. आज सगळी पृथ्वीच पालटली आहे. आपल्या रोजच्या रस्त्यावर हें नवंच झाड उगवलं, त्यामुळेंच हा घोटाळा झाला! ह्यांत माझी कांहींच कसूर नाहीं."




राजाचा मंत्री मोठा शहाणा होता. ह्या वेळीं सारथ्याची बाजूच घेतली पाहिजे हें त्याच्या ध्यानांत आलें. तो म्हणाला, "महाराज, सारथी म्हणतो तें अगदीं खरं आहे. आज पृथ्वीवरच बदल झाला आहे. पण मी मंत्रशक्तीनें त्याची पुन्हा उलटापालट करूं शकेन. मात्र ती मंत्रशक्ति इतकी जाज्वल्य आहे कीं ती काम करीत असतां कोणीं डोळे उघडे ठेवले तर

ते भाजून जातील! ह्यासाठीं तुम्ही दोघांनीं डोळे मिटा म्हणजे मी मंत्राचा जप करून पृथ्वी पूर्वींसारखी करीन!"

दोघांनीं डोळे मिटतांच मंत्र्यानें हळूच रथ धरून तो रस्त्यावर आणला!

रथापुढें झाड नाहीं हें पाहून राजाची समजूत झाली!

## १९. मरणाला फसविलें !



फ्रान्स देशाचा राजा अकरावा लुई हा राज्य करीत असतां त्याच्या राणीकडे एक ज्योतिषी आला. राणी स्वभावानें भोळसरच होती. तिचा ज्योतिषावर विश्वास होता. थोड्याच दिवसांत त्यानें सांगितल्याप्रमाणें कांहीं गोष्टी घडल्याचें तिला दिसून आलें, त्यामुळें तर तिचा विश्वास त्या ज्योतिष्यावर विशेष बसला. एके दिवशीं राणीनें त्याला विचारलें, "ज्योतिषीबुवा, माझा मृत्यु अजून दूर आहे ना?"

ज्योतिष्यानें तिच्या चेहेऱ्यावरील रेषांचें सूक्ष्म अवलोकन करीत म्हटलें, "राणीसाहेब, दिलगीर आहें मी. मला वाटतं, आजपासून बरोबर एक वर्षानें आपण मृत्यु पावणार!" राणीला तर धक्काच बसला, पण काय करणार!

त्या धक्क्यानें म्हणा किंवा तिचें खरोखर आयुष्य सरलें म्हणून म्हणा, ती खंगत चालली. राजाला ही वार्ता कळतांच त्याला त्या ज्योतिष्याचा राग आला व हें भविष्य खरें झालें तर त्याला मृत्युदंडच द्यावयाचा असें त्यानें ठरविलें. दुर्दैवानें त्याचें भविष्य खरें झालें ! त्यानें सांगितल्या दिवशीं ठरल्या वेळीं राणी मृत्युमुखीं पडली !


राणीच्या मृत्यूनें तर लुई राजा फारच संतापला. त्या ज्योतिष्याला देहान्त शासन द्यावयाचें ठरवून त्यानें त्याला बोलावून आणलें व मोठ्या रागानें म्हटलें, " तुम्हांला लोकांचा मृत्यु कधीं आहे हें नेमकं सांगतां येतं असं दिसतं. मग तुमचा स्वतःचा मृत्यु कधीं आहे सांगा पाहूं. "



ज्योतिषीबुवानें ओळखलें कीं राजा भयंकर संतापला आहे आणि आपल्याला मृत्युदंडाची शिक्षा देण्याच्या विचारांत आहे. आपल्या भविष्य-विद्येचा थोडा कां होईना परिणाम राजावर झाला आहे. त्यानें थोडा विचार केला अन् म्हटलें, " सरकार, रागावूं नका. माझा मृत्यु माझ्या डोळ्यांपुढें दिसत आहे, पण तो दुसऱ्या एकाच्या मृत्यूवर अवलंबून आहे. माझा

ज्योतिषज्ञान मला सांगतं कीं माझा मृत्यु महाराजांच्या मृत्यूच्या अगोदर फक्त तीन दिवस होणार आहे ! ''

ज्योतिष्याला मृत्युदंड दिल्यानें आपला मृत्यु तर लवकर होणार नाहीं ना ह्या भीतीनें राजानें त्याला घालवून दिलें !




## २०. प्रसंगावधान

येसवा पवार आतां अगदीं वृद्ध झाला होता. दुर्दैवानें त्याची बायको, मुलगा सर्व माणसें आधींच मरून गेलीं आणि तो एकटाच उघडा पडला होता. त्याचें वयही पाऊणशेंहून जास्त झालें होतें. तो आतां थकला होता, पण त्याची काळजी घ्यायला कोण होतें ? ह्या वयांतही त्याला मोलमजुरी करावी लागत होती !

रोज सकाळीं उठावें, दोन तीन मैल दूरच्या जंगलांत जावें, तेथें लाकडें तोडून त्यांची भारी बांधावी, ती शहरगांवीं नेऊन विकावी अन् रोजच्या पुरेसें अन्न मिळवावें ही त्याची दिनचर्या ! पण म्हातारपणामुळें त्याला आतां अशक्तपणा आला होता. ही दिनचर्या चालू ठेवणें त्याला अतिशय कष्टप्रद झालें होतें. तरीही नाइलाजानें तो काम करून पोट भरीत होता !

दमल्यामुळें त्याला कधीं कधीं वाटे, आतां परमेश्वरानें आपले डोळे मिटवावे, पण हा विचार क्षणिकच; कारण जगण्याचा लोभ फार कठीण असतो! अति कष्टानें मरण आलेलें पुरवलें असें माणूस म्हणतो पण क्षणभरच! त्याला खरोखर मरण यावें असें मुळींच वाटत नसतें!


येसबाचेंही असेंच झालें. एके दिवशीं तो जंगलांत गेला. तेथें मोठ्या कष्टानें लाकडें तोडून त्यानें त्या लाकडांची मोळी बांधिली. समोरच एका दगडावर बसून त्यानें एक विडी शिलगावली! तोंच त्याच्या मनांत आलें, आपण फार फार कष्ट केले. आतां खरोखर आपल्याला मृत्यु यावा हें चांगलें, म्हणजे ह्या सर्व कष्टांतून आपली सुटका होईल! त्यानें दोन्ही हात जोडले अन् डोळे मिटून म्हटलें, “यमराजा, आतां कृपा करा आणि एकवार भेट द्या म्हणजे मी ह्या सर्व दुःखांतून मुक्त होईन!”




असें म्हणून त्यानें डोळे उघडले, तों काय चमत्कार! त्याच्यापुढें खुद्द यमराजाचीच स्वारी उभी! हातांत प्राणाला पकडून नेण्याचा फांसही होता! आतां मात्र येसबाची घाबरगुंडी उडाली. तरी पण तो मोठा

प्रसंगावधानी होता. एवढ्यांत यमराजानेंच त्याला म्हटलें, " कां येसबा, आज माझी कां आठवण झाली आपल्याला ? "

येसबानें चटकन म्हटलें, " एवढी मोळी वळवून माझ्या डोक्यावर ठेवलीत तर फार उपकार होतील ! "




## २१. गाढवाचे भाईबंद

मल्लप्पा कुंभाराचें एक गाढव होतें. त्या गाढवावरून माती, दगड, कौलें, मडकीं वाहून पोचविणें हीं कामें तो करी. त्या कामांतून त्याला थोडाफार पैसा मिळे आणि त्या पैशानें तो आपली गुजराण करी. अशा रीतीनें गाढवाच्या श्रमावर तो आपला निर्वाह चालवी, पण त्या गाढवाची मात्र कांहीं काळजी घेत नसे. आज ना उद्यां आपला मालक आपल्या कामगिरीची जाणीव ठेवून आपला परामर्ष घेईल, निदान पोटाला पुरेसें खायला तरी घालील अशी त्याला आशा वाटत असे.


बरेच दिवस गेले. गाढव मात्र निराश झालें. कारण मल्लप्पा त्याची बिलकूलच काळजी करीना. शेवटीं त्या मूक प्राण्यानें मनाशीं निर्धार केला कीं योग्य संधि मिळतांच आपल्या धन्याला हात दाखवावयाचा. त्याच्या सुदैवानें त्याला लवकरच तशी संधि मिळाली. एका मिठाच्या व्यापाऱ्यानें मिठाचें एक पोतें गांवीं पोंचविण्याचें काम मल्लप्पाला दिलें.

त्या व्यापाऱ्याच्या गांवीं जाण्याच्या मार्गावर एक छोटीशी नदी होती. त्या नदींतून पलीकडे सहज जातां येत होतें. गाढव नदीच्या किनाऱ्यावर येतांच पाण्यांत शिरण्यास तें जरा कांकू करूं लागलें. तोंच मालकाची काठी त्याच्या पाठींत बसली. मारानें कळवळलेलें गाढव पाण्यांत शिरलें. थोडें वाकतांच मिठाच्या पोत्याला पाणी लागलें नि त्यांतलें मीठ वाहून गेलें.



मल्लुप्पा गांवीं पोचला तों त्याचें लक्ष गाढवाकडे गेलें. जवळ जवळ अर्धें मीठ कमी झालेलें त्याला दिसलें. मीठच कमी झाल्यावर तो व्यापारी मजुरी काय देणार? ह्यामुळें मल्लुप्पाला गाढवाचा भयंकर राग आला. त्यानें एक काठी घेतली व त्या गाढवाला चोप देण्यास सुरुवात केली. त्यानें गाढवाला इतका चोप दिला कीं आजूबाजूला खूप लोक जमले आणि ते त्याला विनवूं लागले कीं "विनाकारण ह्या मुक्या जीवाला बदडूं नकोस." मल्लुप्पाला आतां त्यांचाही राग आला. हातांतील काठी फेकून देऊन तो गाढवाच्या समोर उभा राहिला. त्याला हात जोडून तो म्हणाला, "गाढवराया, तुझे इतके भाईबंद असतील अन् ते तुझ्याबद्दल रदबदली करतील असं मला अगोदर माहीत असतं तर मीं तुला मुळींच चोप नसता रे दिला!"

# २२. ह्याला म्हणतात चातुर्य



पुष्कळ शिक्षणानें मनुष्य पंडित होतो हें खरें. त्याला कांहीं विषयांची माहिती होऊन त्या विषयांत तो तज्ज्ञ होतो. पण ह्यावरून त्याची बुद्धिमत्ता वाढते असें मात्र नाहीं. पुष्कळ वेळां असें आढळतें कीं कांहीं बुद्धिमान् माणसांना शिकण्याची संधि मिळत नाहीं. तरीपण असलीं माणसेंसुद्धा कधीं कधीं बुद्धीची चमक दाखवून इतरांना चकित केल्याविना राहात नाहींत.

एकदा एक पंडित आगगाडींतून प्रवासाला निघाले. गाडींत गर्दी अजिबात नव्हती. त्यांच्या शेजारीं एक अशिक्षित माणूस बसला होता. आपली हुशारी त्याला दाखवावी अशी त्यांना फार इच्छा झाली. थोड्याच वेळानें ते त्याला म्हणाले, "अहो, आपण तर दोघेच डब्यांत बसलों आहोंत. प्रवास तर बराच लांबचा. वेळ कसा जाणार?"

तो खेडवळ म्हणाला, "तुम्हींच काढा कांहीं युक्ति! तुम्ही खूप पुस्तकं पण वाचलीं असतील. सांगा कीं मला कांहीं त्यांतली माहिती." ह्या उत्तरानें पंडितांना तर स्फुरणच चढलें. ते म्हणाले, "तसं कशाला, आपण एकमेकांना प्रश्न विचारूं. ज्याला उत्तर सांगतां येणार नाहीं त्यानें प्रश्न विचारणाराला एक रुपया द्यावयाचा. आहे कबूल?"

तो खेडवळ गृहस्थ म्हणाला, " साहेब, मी आहें गरीब. मजजवळ कुठले एवढे रुपये ! पण मी चार आणे देईन."

शेवटीं दोघांच्या मतें ठरलें कीं पंडितवर्यांना उत्तर सांगतां आलें नाहीं तर त्यांनीं एक रुपया द्यावयाचा अणि खेडवळाला उत्तर सांगतां आलें नाहीं तर त्यानें पंडितांना चार आणे द्यावयाचे. वेळांत वेळही जाईल आणि मिळाले तर थोडेफार पैसेही मिळतील असें पंडितांना वाटलें; कारण ह्या खेडवळ माणसाला काय आपण केव्हांच निरुत्तर करूं अशी त्यांना घमेंड वाटत होती. मग ते त्या खेडवळ माणसाला म्हणाले, " हं, तुम्हीच विचारा पहिल्यानं मला तुमचा प्रश्न." ह्याच्या प्रश्नाचें उत्तर हां हां म्हणतां आपण देऊं अशा आविर्भावानें पंडित म्हणाले.




तो खेडवळ म्हणाला, " तीन पायांनीं चालतो अन् एकाच पायानें उडतो असा प्राणी कोणता ? " पंडितांनीं बराच वेळ विचार केला पण ह्या प्रश्नाचें उत्तर त्यांना देतां येईना. ते म्हणाले, " हरलों बुवा मी ! हा घ्या एक रुपया." असें म्हणून त्यांनीं चटकन् एक रुपया काढून त्या गृहस्थाला दिला व म्हटलें, " बरं, तुम्हीच सांगा ना ह्या प्रश्नाचं

उत्तर." तो खेडवळ गृहस्थ हसत म्हणाला, "अहो मला तरी कुठें येतं आहे ह्याचं उत्तर! हे घ्या चार आणे!"

हें ऐकतांच पंडित गुपचुप बसले!

## २३. सोन्याची किल्ली



एकदा एक माणूस शेजारच्या गांवीं जावयास निघाला. सायंकाळीं त्या गांवाच्या जवळ आला तों पावसाला सुरुवात झाली. दिवसभर चालल्यानें तो मनुष्य आधींच थकून गेला होता. त्याच्याबरोबर त्याचा बिछाना व दुसरें सामान भरलेली पेटी पण होती. त्या ओझ्यानेंही तो दमला होता. आतां लवकरच गांवीं पोचूं ह्या आनंदांत तो होता तोंच जोराचा वारा सुटला, जिकडे तिकडे धूळ उडूं लागली अन् खूप मोठें वादळ झालें. पावसानें आपण व आपलें सामान भिजून जाणार अशी त्याला भीति वाटूं लागली. जवळपास कोठें निवाऱ्यासाठीं एखादें घर दिसतें का पाहावें म्हणून तो गृहस्थ इकडे तिकडे पाहूं लागला. पाऊलही जरा जोरानें उचलूं लागला. थोड्या अंतरावर त्याला एक धर्मशाळा दिसली. त्याला फार आनंद वाटला. थोडा वेग वाढवून तो त्या धर्मशाळेपाशीं पोचला.

त्यानें दार लोटून पाहिलें तों तें आंतून बंद होतें. तेव्हां आंतील माणसांस तो मोठ्यानें हाका मारूं लागला. "दार उघडा, मी थकून आलेला प्रवासी


आहें, बाहेर पावसांत भिजत आहें. कृपा करून दार उघडा." असें तो मोठ्यानें सांगूं लागला. आंतून उत्तर नाहीं असें पाहून तो दार जोरजोरानें ठोकूं लागला. तेव्हां आंतून कोणीतरी बोललें, "दार बंद आहे. त्याला सोनेरी किल्ली लागते. मी ती बाहेर कोठें विसरलों आहें. तुम्हांला सापडली तर आंत टाका."

तो प्रवासी मनांत समजला. त्यानें एक मोहोर दाराच्या फटींतून आंत टाकली. प्रवाशाचें काम झालें. ती मोहोर मिळतांच आंतील माणसानें दार उघडलें. लागलीच पावसांत भिजून चिंब झालेला प्रवासी कुडकुडत आंत शिरला. आंत जातांच त्या माणसानें दार लावून घेतलें. तोंच प्रवासी म्हणाला, "मी अगदीं थकून गेलों आहें. माझी पेटी बाहेर आहे तेवढी उचलून आंत घ्या ना. फार उपकार होतील."



तो माणूस दार उघडून बाहेर आला व पेटी पाहूं लागला तोंच प्रवाशानें आंतून दार बंद केलें व कडी लावून टाकली, तोंच तो माणूस आंत येण्यासाठीं दार लोटूं लागला. प्रवासी त्याला दाराआडून म्हणाला, "महाशय, ती सोनेरी किल्ली तुमच्या खिशांत आहे तेवढी आंत टाका, एरवीं दार कसें उघडूं? तुम्ही बाहेर जातांच तें आंतून बंद झालें आहे."

आतां आपलें कांहीं चालणार नाहीं असें पाहून त्या माणसानें प्रवाशा-कडून मिळविलेली मोहोर दाराच्या फटींतून आंत टाकली तेव्हां कोठें प्रवाशानें दार उघडलें व त्याला आंत घेतलें !




## २४. महत्त्वाच्या गोष्टी

महात्मा गांधी हे गोलमेज परिषदेसाठीं विलायतेस निघाले होते. भारताला स्वातंत्र्य मिळावें, स्वराज्य मिळावें, निदान कांहीं तरी हक्क मिळावेत अशी त्या वेळीं सर्वच हिंदी पुढाऱ्यांची इच्छा असे. ह्या उलट शक्य तितकें कमी देण्याची कारवाई इंग्रज सरकार करीत असे. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळणें म्हणजे एखाद्या मुलाला खेळायला चंद्र मिळणें होय अशी कल्पना त्या वेळीं इंग्रज माणसाच्या डोक्यांत होती. त्यामुळें हिंदी स्वातंत्र्याची चळवळ ही अशक्य कोटींतील असून स्वातंत्र्याची मागणी हा एक थट्टा करण्यासारखा विषय आहे असें इंग्रज समजत. गांधीजी ज्या आगबोटीनें निघाले होते त्या आगबोटीवर अनेक इंग्रज लोकही होते. त्यांपैकीं एक सद्गृहस्थ गांधीजींचा उपहास करण्याची पराकाष्ठा करीत होता. गांधींचा मार्ग चुकीचा अतएव त्याज्य आहे, कारण हिंदी माणूस कितीही शिकला तरी तो इंग्रजांच्या बरोबरीला येणें शक्य नाहीं, म्हणून हिंदी माणसांनीं इंग्रजी अमलाखालीं शांतपणें राहावें असें त्याचें मत होतें. आपलें मत

पटवून देण्यासाठीं तो गांधीजींना दररोज लांब लांब पत्रें लिहूं लागला. एक दोन पत्रें गांधीजींनीं वाचून पाहिलीं. पण त्यांत उपहासाशिवाय कांहीं नाहीं असें पाहून त्यांनीं त्या पत्रांतील टांचण्या काढून घेतल्या व तीं पत्रें निरुपयोगी कागद टाकण्याच्या टोपलींत फेकून दिलीं. त्या गृहस्थाचा पत्रें पाठविण्याचा कार्यक्रम आठदहा दिवस चालू होता. टांचण्या काढून पत्रें फेकण्याचा कार्यक्रम गांधीनींही चालू ठेवला होता.

आपण स्वतःच गांधींना भेटावें असें ठरवून त्या गृहस्थानें गांधींची अनुमति मिळविली व त्यांनीं दिल्या वेळीं तो त्यांना भेटावयास गेला. "मीं पाठविलेलीं पत्रं पोंचलीं का? कसे काय वाटले माझे विचार आपल्याला?" असें त्यानें विचारतांच, "हीं पाहा आपलीं सर्व पत्रं." असें म्हणत गांधींनीं टेबलाखालच्या टाकून देण्याच्या कागदांच्या टोपलीकडे बोट दाखविलें. गृहस्थ थोडा नाराज झाला. मनांतल्या मनांत



गुरगुरलाही! तरीपण आपण इंग्रज असल्यानें कोणाही हिंदी माणसाला उपदेश करण्याचा आपला जन्मसिद्ध हक्क आहे अशा आविर्भावानें तो गांधीजींना म्हणाला, "तुम्ही कांहीं म्हणा, पण माझ्या ह्या पत्रांत कांहीं

च्या गोष्टी आहेत त्या घेण्यास तुम्हांस कमीपणा वाटूं नये. तुम्ही ह्या विचार करा." गांधीजी हसून म्हणाले, "अहो, महत्त्वाच्या गोष्टी मीं अगोदरच घेतल्या आहेत. ह्या पाहा त्या!" असें म्हणून त्यांनीं त्या गृहस्थाला पत्रांतून काढून घेतलेल्या टांचण्या दाखविल्या!

## २५. कसें बोलावें?



फार फार वर्षांपूर्वींची गोष्ट. अनंतपुर शहरांत अनंतबुद्धि नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याचा ज्योतिषशास्त्रावर फार मोठा भरंवसा होता. ह्यामुळें त्यानें आपल्या पदरीं विद्वान् ज्योतिषी बाळगले होते.

एकदा त्या राजाला एक स्वप्न पडलें. स्वप्नांत त्यानें आपले सर्व दांत पडून गेले आहेत असें पाहिलें. राजज्योतिष्याला बोलावणें गेलें. राजज्योतिषी त्या दिवशीं बाहेरगांवीं कामाला गेले होते. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीवही ज्योतिषशास्त्र-पारंगत होते. त्यांना राजानें बोलावून आणलें व आपलें स्वप्न सांगून म्हटलें, "ह्या स्वप्नाचा काय अर्थ वाटतो आपल्याला?" ज्योतिषी शास्त्र शिकला होता खरा पण प्रसंग ओळखण्याची कला त्याला साधली नव्हती. तो म्हणाला, "महाराज, ह्या स्वप्नाचा अर्थ अगदीं उघड आहे. आपले दांत म्हणजे साहाय्यक असे आपले पुत्रादिक संबंधी लवकरच नष्ट होणार असा ह्याचा अर्थ आहे."

हें ऐकून राजाला फार वाईट वाटलें. त्याला त्या ज्योतिष्याचा राग आला. तो त्याला म्हणाला, "छट्, मला नाहीं असं वाटत! तुमचं ह्या शास्त्राचं ज्ञान अगदींच तुटपुंजं दिसतं! तुमच्या अज्ञानामुळें तुम्ही लोकांना संकटांत पाडाल, ह्यासाठीं मी तुम्हांला कैदेंतच ठेवतों." झालें! राजाज्ञेनें त्या तरुण ज्योतिष्याला कारावासांत ठेविलें.



सायंकाळीं राजज्योतिषी गांवाहून आल्यावर त्यांना चिरंजीवांना तुरुंगवास घडल्याचें वर्तमान कळलें. ते धावतच राजाच्या भेटीस आले. राजानें त्यांना आपलें स्वप्न सांगतांच ते म्हणाले, "महाराज, हें स्वप्न तर अत्यंत शुभ आहे. आपले दांत पडूनही आपली प्रकृति ठीक होती ह्याचा अर्थ आपण दीर्घायु आहां. इतरांहून आपलं आयुष्य जास्त आहे असा ह्याचा स्पष्ट अर्थ आहे!" राजा खूष झाला. तें पाहून "चिरंजीवांस सोडा, ज्ञान अजून कच्चं आहे." अशी त्यानें राजाला नम्र विनंती केली! राजानेंही ती तात्काळ मान्य केली!

अर्थ तोच पण वेगळ्या शब्दांत सांगून माणसाला कसें खूष करतां येतें पाहा!

27638

IRBK-0107635 16-3-58